आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ९ वे ● अंक ०७ वा ● शनिवार दि. २१ जून २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## विलास कारखान्याच्या गळीत हंगामाची जय्यत तयारी सुरु; चेअरमन वैशाली विलासराव देशमुख याच्या हस्ते मिल रोलरचे पूजन

लातूर (प्रतिनिधी): विलास सहकारी साखर कारखाना, वैशालीनगर, निवळी येथे आगामी गळीत हंगामाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. गळीत हंगाम वेळेवर आणि पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी केली जात आहे. याच तयारीचा एक भाग म्हणून शुक्रवार, २० जून रोजी कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन चेअरमन वैशाली विलासराव देशमुख आणि सर्व संचालकांच्या उपस्थितीत करण्यात आले. या पूजनानंतर सर्व संचालकांच्या उपस्थितीत गळीत हंगाम तयारीबाबत आढावा बैठकही संपन्न झाली. यावेळी येणाऱ्या हंगामात ९ लाख मे.टन ऊस गाळपाचे उदिष्ट निश्र्चीत करण्यात आले आहे.



**येणारा हंगाम यशस्वी करण्यासाठी सूक्ष्म नियोजन**

विलास कारखाना कार्यक्षेत्रात गळीत हंगाम २०२५-२६ साठी ऊसाचे मोठे क्षेत्र उपलब्ध आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रातील ऊसाचे वेळेवर गाळप होण्यासाठी कारखान्याचे संस्थापक चेअरमन, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा माजी पालकमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख आणि चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी गळीत हंगाम लवकर सुरू करण्याच्या दृष्टीने तयारी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या अनुषंगाने सर्व हंगामपूर्व यंत्रसामुग्री देखभाल व दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर असून, मागील गळीत हंगामाप्रमाणेच येणारा हंगामही यशस्वी करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे.

**भरपूर ऊस उपलब्धता आणि यांत्रिकीकरण**

आगामी गळीत हंगामासाठी कारखाना कार्यक्षेत्रात पुरेसा ऊस उपलब्ध आहे. कारखान्याकडे सभासदांच्या १४८९३.३७ हेक्टर तर बिगर सभासदांच्या ५७९० हेक्टर अशा एकूण २०६८७ हेक्टर ऊसाची नोंदणी झाली आहे. विलास साखर कारखान्याने ऊस तोडणीचे योग्य नियोजन केले असून, या हंगामात जास्तीत जास्त ऊस हा तोडणीयंत्राद्वारे तोडणी करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात कारखान्यामार्फत १५ हार्वेस्टर खरेदी केले जाणार आहेत. भविष्यात ऊसाची उपलब्धता पाहता, १०० टक्के ऊस तोडणी यंत्राद्वारे केल्यानंतर ऊसाचे गाळप करण्यासाठी आवश्यक असणारी मशिनरी बसविण्यात येत आहे.

या हंगामात तांत्रिक कारणांमुळे कारखाना बंद तास कमी राहतील याची दक्षता घेतली जाणार आहे. हंगाम बंद असताना सुरू असलेली मशिनरी देखभाल व दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर असून, हंगाम सुरू होण्याअगोदरच कारखाना गळीत हंगामासाठी सज्ज असेल. कारखान्याचे कार्यकारी संचालक संजीव देसाई यांनी ही माहिती दिली आहे.

यशस्वी वाटचाल आणि विक्रमी ऊसदर

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेतून उभा राहिलेला विलास सहकारी साखर कारखाना माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या कुशल नियोजनानुसार, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, माजी आमदार धीरज विलासराव देशमुख आणि कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी वाटचाल करत आहे. विलास सहकारी साखर कारखान्याने मागील गळीत हंगामात ऊस उत्पादकांना प्रति मेट्रिक टन तब्बल रु. ३०००/- इतका उच्चांकी दर दिला आहे. यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये मोठे आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण आहे. या विक्रमी दरामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यास मदत झाली असून, कारखान्याच्या यशस्वी वाटचालीची ही एक महत्त्वाचे पाऊल आहे.

मील रोलर पूजन कार्यक्रमास माजी आमदार व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे, ट्वेंटीवन शुगर्सचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, कार्यकारी संचालक संजीव देसाई, डॉ. सारीका देशमुख, माजी व्हा. चेअरमन विद्यमान संचालक रवींद्र काळे, संचालक सर्वश्री रणजित पाटील, अनंत बारबोले, रसूल पटेल, तात्यासाहेब पालकर, गोवर्धन मोरे, हणमंत पवार, नरसिंग बुलबुले, नेताजी साळुंके (देशमुख), नितीन पाटील, रामराव साळुंके, अमृत जाधव, सतीश शिंदे (पाटील), दीपक बनसोडे, लताबाई देशमुख, शाम बरुरे, सुभाष माने, रमेश देशमुख आदी उपस्थित होते.

## पश्चिम बंगालने देशाला अनेक क्षेत्रात विचारवंत दिले- राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

मुंबई, : पश्चिम बंगालने देशाला अनेक



क्षेत्रात थोर विचारवंत व क्रांतिकारक दिले. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात लाल – बाल – पाल या त्रयींसह महाराष्ट्र, पंजाब व पश्र्चिम बंगालने देशाला नेतृत्व प्रदान केले, असे नमूद करून विकसित भारताचे लक्ष्य गाठताना देखील महाराष्ट्रासह पश्र्चिम बंगाल मोठे योगदान देईल, असा विश्र्वास राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.

'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन येथे पश्र्चिम बंगाल राज्य स्थापना दिवस सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला, त्यावेळी राज्यपाल राधाकृष्णन बोलत होते.

पश्र्चिम बंगाल देशातील महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र असून या राज्याने देशाला वैज्ञानिक, चित्रपट निर्माते, संगीतकार व कलाकार दिले आहेत. बंगालने देशाला डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, डॉ. मेघनाद सहा, हिरेन मुखर्जी, प्रणब मुखर्जी, सोमनाथ चॅटर्जी यांसारखे संसदपटू दिले असे सांगून आपल्याला प्रणब मुखर्जी व सोमनाथ चॅटर्जी यांच्या कार्यकाळात काम करण्याची संधी मिळाली असल्याचे राज्यपाल राधाकृष्णन यांनी नमूद केले.

यावेळी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी पश्र्चिम बंगालच्या लोकसंस्कृतीचे लोकगीत व नृत्याच्या माध्यमातून उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल राज्यपालांनी विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली.

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी यावेळी स्वागतपर भाषण केले तर अवर सचिव करुणा वावडणकर यांनी आभार मानले. राज्यपालांच्या हस्ते पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. प्रकाश महानवर यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. केदारनाथ कळवणे, मुंबईतील बंगाली भाषिक निमंत्रित, विद्यापीठाचे विद्यार्थी, कलाकार तसेच राजभवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विद्यापीठाच्या दोन विद्यार्थ्यांनी यावेळी सजीव चित्रकला सादर करीत आपल्या कलाकृती राज्यपालांना भेट दिल्या.

सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पश्र्चिम बंगालचे 'एलो दुर्गा माँ' लोकगीत, रवींद्रनाथ टागोर यांच्या दृष्टीतून पश्र्चिम बंगाल हे एकपात्री सादरीकरण, रैबेनशे लोकनृत्य व मुलींचे झुमर लोकनृत्य सादर केले.

## मध्यवर्ती बसस्थानक, जुना रेणापूर नाका बसस्थानकावरुन २३ जून पासून सुटणाऱ्या बस फेऱ्यांचे नियोजन जाहीर

लातूर, : शहरातील गांधी चौक येथील मध्यवर्ती बस



स्थानक क्र. १ आणि अंबेजोगाई रोडवरील जुना रेणापूर नाका येथील बसस्थानक क्र. २ येथून सुटणाऱ्या बसफेऱ्यांचे नवीन नियोजन जाहीर करण्यात आले आहे. २३ जून, २०२५ पासून या नियोजनानुसार बसेस सुटतील, असे राज्य परिवहन विभागाचे विभाग नियंत्रक यांनी कळविले आहे.

मध्यवर्ती बसस्थानक क्र. ०१ येथून सुटणाऱ्या बसेस- १. लातूर – नांदेड, नागपूर, अमरावती, अकोला मार्गावरील सर्व ग्रामीण, शटल, लांब पल्ला व मध्यम लांब पल्ला बसेस. २. लातूर- तुळजापुर- सोलापूर-पंढरपूर-कोल्हापूर मार्गावरील सर्व बसेस.

३. लातूर-धाराशिव मार्गावरील सर्व शटल बसेस व पुढे तुळजापुर, सोलापुर मार्गावर जाणा-या बसेस. ४. लातूर- आष्टा-उदगीर मार्गावरील सर्व ग्रामीण, शटल, लांब पल्ला व मध्यम लांब पल्ला बसेस. ५. लातूर-जळकोट, मुखेड, बिलोली, निजामाबाद मार्गावरील सर्व ग्रामीण, शटल, लांब पल्ला व मध्यम लांब पल्ला बसेस. ६. पुणे मार्गावरुन येऊन पुढे नांदेड, उदगीर, मुखेड या मार्गावर धावणाऱ्या सर्व बसेस मध्यवर्ती बसस्थानक क्रमांक ०१ येथे प्रवाशी चढ उतार करून पुढे नांदेड, उदगीर मार्गावर धावतील. ७. लातुर-औसा, लातुर-उमरगा, लातुर- निलंगा व पुढे बिदर, हैदाबाद जाणा-या सर्व बसेस. ८. औसा व निलंगा आगाराच्या पुर्ववत चालु असलेल्या सर्व ग्रामीण व रात्रवस्ती बसेस. मध्यवर्ती बसस्थानक येथील ग्रामीण बसस्थानकावरुन सुटणा-या बसेस. बसस्थानक क्र. ०२ जुना रेणापूर नाका अंबेजोगाई रोड लातूर येथून सुटणाऱ्या बसेस- १. लातुर-अंबेजोगाई बीड मार्गावरुन पुढे धावणाऱ्या सर्व बसेस. २. लातुर -अंबेजोगाई- परळी- परभणी मार्गावरुन पुढे धावणाऱ्या सर्व बसेस. ३. लातुर – बार्शी – इंदापुर पुणे – मुंबई मार्गावरुन धावणाऱ्या सर्व बसेस.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर महाराजांच्या पादुकांचे दर्शन

पुणे : आषाढी पालखी सोहळ्यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांनी भवानी पेठेतील पालखी विठ्ठल मंदिरात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर महाराज यांच्या पादुकांचे शुक्रवार (२०) रोजी दर्शन घेतले. मंदिरात त्यांच्या हस्ते पालखीची पूजा झाली.

मंदिर समितीच्यावतीने मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, श्री ज्ञानेश्र्वर महाराज संस्थांचे प्रमुख विश्र्वस्त योगी निरंजननाथ, गुरु शांतिनाथ, राजेंद्र उमाप, भावार्थ देखणे, पुरुषोत्तम पाटील, पालखी विठ्ठल मंदिर संस्थांचे अध्यक्ष तेजेंद्र कोंढरे, विश्र्वस्त प्रमोद बेंगरूट, शिवाजीराव जगदाळे, गोरख भिकुले आदी उपस्थित होते.मुख्यमंत्र्यांनी आषाढी वारी निमित्त पालखीसोबत पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. तत्पूर्वी विठ्ठल नामाचा गजर आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात टाळ मृदुंगाच्या तालावर भक्तिमय वातावरणात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर महाराज पालखीचे विठ्ठल मंदिरात आगमन झाले. मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर वारकरी व भक्तगण उपस्थित होते.

## आर्थिक महाशक्ती होताना व्यापार व उद्योगांचे महत्त्वाचे योगदान - केंद्रीय मंत्री अमित शाह

मुंबई, : देशाच्या नीती निर्धारणांमध्ये मूलगामी बदल घडविले असून भारतास २०२७ पर्यंत जगातली तिसरी आर्थिक महाशक्ती म्हणून स्थान संपादन करताना व्यापार व उद्योगांचे महत्त्वाचे योगदान राहील, असे प्रतिपादन केंद्रीय सहकार व गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ग्रीकल्चरच्या शताब्दी वर्षानिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित 'सहकारी व शासकीय औद्योगिक वसाहती राज्यस्तरीय परिषदे'चे उद्घाटन व मार्गदर्शन करताना केंद्रीय गृहमंत्री शाह बोलत होते.




परिषदेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, केंद्रीय सहकार आणि नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उद्योग, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, कौशल्य, रोजगार व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांची प्रमुख उपस्थिती होती.

गृहमंत्री शाह म्हणाले, महाराष्ट्र शासनाच्या विकासात्मक कामांमुळे मुंबईच्या पायाभूत विकासात अमुलाग्र बदल होत आहेत. मेट्रो, अटल सागरी सेतू, कोस्टल रोड करतानाच पुनर्विकासाची कामे वेगात सुरु आहेत. यामुळे मुंबईची पूर्वीची ट्रॅफिक, वाढत्या लोकसंख्येमुळे होणारी चिंताजनक स्थिती बदलू लागली आहे. देशात विकासासाठी सर्व क्षेत्रात काम करताना, महाराष्ट्राच्या विकासासाठी केंद्राने लॉजिस्टिक पार्क, देशातील ११ पैकी तीन औद्योगिक कॉरीडोर, बारा पैकी सात टेक्स्टाईल पार्क महाराष्ट्रात दिले आहेत. वैनगंगा नळगंगा प्रकल्पास पंचवीस हजार करोड रुपये उपलब्ध केले आहेत. विदर्भ मराठवाड्यातील दुष्काळ संपवून समृद्धी आणली जाईल. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सकारात्मक काम होत आहेत.

केंद्र व राज्यात समान विचारांचे सरकार असल्यामुळे महाराष्ट्राच्या विकासाचा वेग प्रचंड वाढला आहे. केंद्र सरकारने विविध अनुदानांच्या निधीतून राज्यामध्ये मोठी रक्कम विकासासाठी दिली आहे. यामध्ये पायाभूत विकासासाठी १० लक्ष करोड रुपये दिले असून केंद्र पुरस्कृत योजनांची अनुदान, राजस्व तूट अनुदान (वर्शीश्रींळेप सीरपीं) याचा उल्लेख करता येईल. असे सांगून केंद्रीय मंत्री शाह यांनी राज्यासाठी दिलेल्या विविध निधीची माहिती दिली.

केंद्रीय मंत्री शाह म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नीती निर्धारण धोरणामुळे आर्थिक विकासाबरोबरच भारताचा ' पासपोर्ट' शक्तिशाली झाल्याचा अनुभव अनेकांना येत आहे. विदेशात भारतीयांचे स्वागत हसून होत असून सन्मान मिळत आहे.

इंग्रज सत्तेच्या काळात उद्योग व विकासासाठी चेंबर्स ऑफ कॉमर्स ने केलेले काम बहुमोल असून पुढे येणाऱ्या शंभर वर्षात देखील देशाच्या अर्थव्यवस्थेला उच्च स्थानावर नेण्यामध्ये महत्त्वाची जबाबदारी निभावेल, असा विश्र्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

उद्योजक व व्यापाऱ्यांच्या योगदानामुळे महाराष्ट्र हे देशातले अग्रेसर राज्य – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्र राज्याने एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करताना अर्धा टप्पा पार केला आहे. देशाच्या ३१ टक्के परकीय गुंतवणूक मिळवण्यात देखील राज्याचा वाटा आहे. सर्वात जास्त वस्तू व सेवा कर जमा करणारे महाराष्ट्र राज्य असून या अग्रेसर राहण्यामध्ये राज्यातील उद्योग व व्यापाऱ्यांचे योगदान आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

उद्योग व व्यापारासाठी महाराष्ट्र शासनाचे सहकार्य राहिले आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर यांनी पारतंत्र्याच्या काळापासून शंभर वर्षाच्या वाटचालीमध्ये देशाच्या उद्योग व विकासाचे भारतीयकरण होण्यासाठी महत्त्वपूर्ण काम केले आहे. हे एकमेव असे चेंबर ऑफ कॉमर्स आहे की, ज्यामध्ये कृषीचा देखील समावेश आहे. येथून पुढे देखील आपल्या माध्यमातून जास्तीत जास्त रोजगार, उद्योग, शेती विकासामध्ये संधी निर्माण कराव्यात, असे आवाहन मुख्यमंत्री **(पान २ वर)...**

## अहमदाबाद सारखी विमान दुर्घटना मुंबईत घडली तर.. : विमानतळ परिसरातील झोपड्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाची चिंता

मुंबई : मुंबई विमानतळाच्या आसपास मोठ्या प्रमाणात झोपड्या उभ्या राहत आहेत. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयानं चिंता व्यक्त केली. ''अहमदाबाद सारखी घटना मुंबईत घडली तर काय होईल, याची केवळ कल्पना करा. सव्वा लाख लिटर जळतं पेट्रोल विमानतळाच्या आसपास जर पडलं तर...,'' अशी चिंता मुंबई उच्च न्यायालयानं गुरुवारी व्यक्त केली आहे.

अहमदाबाद दुर्घटनेमागची गंभीरता लक्षात घ्या : एसआरएशी संबंधित एका प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान मुंबई उच्च न्यायालयानं १२ जून रोजी अहमदाबादमध्ये घडलेल्या विमान दुर्घटनेचा दाखला दिला. मुंबई विमानतळाशेजारी अनेक झोपड्या आहेत. अहमदाबादमध्ये कोसळलेल्या विमानात सव्वा लाख लिटर पेट्रोल होते. या घटनेची गंभीरता लक्षात घेऊन अशी दुर्घटना इथं होऊ नये, यासाठी काय करता येईल? हे तपासण्याचे निर्देश न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठानं राज्य सरकारला दिले आहेत. काय आहे प्रकरण : एसआरए कायद्याचा पुनर्विचार करुन त्यात काही बदल करता येईल का?, याचा विचार करा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं मुंबई उच्च न्यायालयाला दिले आहेत. त्यानुसार याप्रकरणी सुनावणीकरत न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या विशेष खंडपीठाची निर्मिती करण्यात आली आहे.

## जिल्हा व ग्रामीण यांच्यावतीने जागतिक योग दिनानिमित्त कार्यक्रम

लातूर : आर्षयोग प्रतिष्ठान, पतंजलि योग समिती व भाजपा लातूर शहर जिल्हा व ग्रामीण यांच्यावतीने जागतिक योग दिनानिमित्त २१ जून २०२५ रोजी सकाळी ७.३० वा. विवेकानंदपूरम् शैक्षणिक संकुल, पी-७४ एमआयडीसी, कळंब रोड, लातूर येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत जागतिक योगदिनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाला लातूरचे माजी कामगार कल्याण मंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर, औसा मतदार संघाचे आमदार अभिमन्यू पवार, लातूर ग्रामीणचे आमदार रमेशअप्पा कराड, भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपाचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरुमकर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व इतर मान्यवरांना निमंत्रित करण्यात आलेले आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

# आंतरराष्ट्रीय योग दिन

आज २१ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा असा प्रस्ताव मांडला.

२१ जून हा दिवस जगातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस आहे. पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यासाठी लागणाऱ्या वेगामुळे २१ जून हा दिवस इतर दिवसांपेक्षा मोठा असतो. २१ जून रोजी उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते. या दिवशी दिवस मोठा तर रात्र लहान असते. २१ जून रोजी सूर्योदय लवकर होतो आणि सायंकाळी जास्त वेळेपर्यंत उजेड असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्व प्राप्त होते म्हणून हाच दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करावा असा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला.

पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र संघाच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या प्रतिनिधींनी पाठिंबा दिला. सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले अमेरिका, इंग्लंड, फ्रांस, चीन, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनीधी आहेत. या प्रस्तावावर विस्तृत चर्चा झाल्यानंतर डिसेंबर २०१४ मध्ये या दिनाला मान्यता देण्यात आली. २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन जगभर साजरा करण्यात आला. भारतीय प्राचीन संस्कृतीत योग, योगासने, योगसाधना यांना अनन्यसाधारण महत्व आहे. प्राचीन काळापासून भारतातल्या साधुसंत, ऋषीमुनींनी योगाचे महत्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिली आहे.

तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग. आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो ; शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो. भारतातील योगाची संस्कृती जागतिक पातळीवर स्वीकारली गेली आहे. जगभरातील देशांनी योग केवळ स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला आहे. कोरोनारुपी महामारीच्या काळात तर योग दिनाला विशेष महत्व प्राप्त झाले होते. कोरोना सारख्या महामारीचा मुकाबला करायचा असेल तर आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिला पाहिजे. नियमित व्यायाम आणि योगासन यांनी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. योग कसा करावा, कोणती योगासने मनाला आणि शरीराला सक्षम ठेवू शकतात यावर अभ्यासकांनी मते मांडली आहेत त्याप्रमाणे दररोज योग साधना करणे गरजेचे आहे.

आज योग दिनानिमित्त एक दिवस योग करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून या दिनाचा इव्हेंट न करता सर्वांनी योगाचा अंगीकार करून नियमित सराव करावा. जगाने योगाला राजमान्यता दिली आहे आपणही नियमित सराव ठेवून योगसाधना केली तरच आजच्या योग दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## आर्थिक महाशक्ती होताना..

**(पान १ वरुन)** : फडणवीस यांनी केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात देशाच्या विकासामध्ये महाराष्ट्राने मोठी भूमिका बजावली असून राज्याची अर्थव्यवस्था १२ लक्ष कोटी रुपयांवरून चाळीस लक्ष कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

व्यापार व उद्योगासाठी सुरक्षित वातावरण देणारे राज्य – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

महाराष्ट्र राज्यात पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करतानाच, विविध योजना व उपक्रमांच्या माध्यमातून व्यापार व उद्योगासाठी पोषक वातावरण तयार केले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे ऑपरेशन सिंदूर आणि गृहमंत्री शाह यांनी नक्षलवाद पूर्णपणे मिटवून टाकण्यासाठी केलेले काम, अशा सुरक्षित व आशादायी वातावरणात राज्यात सहकारातून समृद्धीकडे जाणारे वातावरण तयार झाले आहे. केंद्रीय मंत्री शाह यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार क्षेत्राचा कायापालट करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा देखील वापर केला जात आहे. तात्काळ निर्णय घेणारे आणि उद्योग वाढीसाठी सुरक्षित वातावरण देणारे हे राज्य आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

शताब्दी वर्षानिमित्त गौरव चिन्हाचे अनावरण

केंद्रीय मंत्री शाह यांच्या हस्ते महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ग्रीकल्चरच्या शताब्दी वर्षानिमित्त गौरव चिन्हाचे अनावरण करण्यात आले. त्यांच्या हस्ते संस्थेच्या मुख्यालयाच्या नूतनीकृत इमारतीच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. तसेच संस्थेच्या प्रमुख विश्र्वस्त व सभासदांना सन्मान चिन्ह प्रदान करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाचा' कौशल्य, रोजगार व उद्योजकता विकास विभाग' आणि 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ग्रीकल्चर' मध्ये यावेळी सामंजस्य करार करण्यात आला.

# तुम्ही काय बोलता; हे तरी कळते का ?

## संपादकीय...

भारतीय समाजकारण, राजकारण, सत्ता कारणामुळे तोंड चेपी हलवा हलवी करणाऱ्या राजकीय नेत्यांनी, सत्ता स्पर्धेच्या नादात तुम्ही आम्ही कोण हेच विसरून गेल्याने, तुम्ही काय बोलता याचे भान तरी आहे काय, हे तरी कळते काय, असा संवेदनशील विषय, प्रश्र्न सर्वसामान्य जनतेसमोर असल्याने, राजकारण सत्ता बाजाराच्या बाजारात पक्षीयनिष्ठा सत्ता कारण वगैरे काही शिल्लक राहिले आहे का, त्यातून राजकीय पक्षनेते आपापला तंबू शाबीत ठेवण्यासाठीचा जो नौटंकी, हाय, फाय, बाय, बाय, या आणि जा असा जो काही राजकीय गोंधळ नव्हे! तमाशा जो चालू आहे. त्यामुळेच सर्वसामान्य जनता हे काय चालले आहे, आम्ही बोलतो तुम्ही काय बोलता हे तरी कळते का, अशी संग्धिद परिस्थिती निर्माण झाल्याने;

स्वतःचा थांग ना पत्ता
तरीही मीच कैवारी !

सत्ताधारी, लालची पण मी तर पाल चित्तचा कैवारी तरीही तुम्ही ओरडता हे मी तरी कळते काय! असा राजकीय संवाद शरद पवार यांनी मूळ राष्ट्रवादी काँग्रेस आणि दगाबाज अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेतील उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या जो कलगीतुरा होतो आहे, तो निव्वळ सर्वसामान्य जनतेचा विश्र्वासघात करणाराच ठरतो यात संदेह नसावा अशीच राजकीय वर्तुळात आश्र्चर्यचकित प्रतिक्रिया उमटताना दिसते, ही कुजबुज नाकारून चालता येणार नाही असे वाटते.

तुम्ही नेते काय बोलतात, आम्हाला काय अपेक्षित आहे, ते आम्हाला कळत नाही. पण तुम्हाला तरी कळते काय? असा प्रश्र्न राजकीय पक्ष नेत्यांना सर्वसामान्य जनता विचारीत असेल तर कोणता राजकीय पक्ष सर्वसामान्यच्या प्रश्र्नाचे उत्तर देईल ! हे एक कोडेच वाटते. अशी कुजबुज होत असताना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार आणि अजित पवार गटाने पक्षाचा जन्मदिवस की वर्धापन दिवस साजरा केला. त्या पाठोपाठ शिवसेनेच्या ठाकरे, शिंदे गटाने तसा उत्सव साजरा केला खरा परंतु या गटातटातील पक्ष नेत्यांनी स्वतःचाच पक्ष, गट खरा आहे, असेच प्रकट करताना, महाराष्ट्रासह सारी भारतीय जनता त्यांच्याच मालकीची प्रॉपर्टी असल्याचा आव, आणून लोकशाही संविधानाची न्याय व हक्काची भाषा अधोरेखित केली हे त्यांचे कर्तव्य, कारभार झाला पण तुम्ही स्वार्थ, सत्तेसाठी उधळत फिरता, विश्र्वासघात करता, तमाम जनतेला, मतदारांना कुजवित ठेवता, तरीही त्यांच्याच जीवावर मालकी हक्क दाखवून, वर्धापन दिनाचे सोहळे साजरी करता. म्हणजे तुम्ही काय करीत आहात, काय बोलता हे तरी तुम्हाला कळते का ? अशी लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे, ती कधीच कोण नाकारणार हा विषय अनुत्तरीतच राहत असेल तर शासन, प्रशासन, लोकशाही विचारसरणीतील व्यक्ती, अभिव्यक्ती स्वातंत्र्याला कोणत्या मोजमापात तोलावे हा प्रश्र्न भेटसावताना दिसतो आहे, हे वास्तव नाकारता येत नाही.

एकंदरीत शरद पवार, अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ऐक्याची धुळरान उडवली आणि राष्ट्रवादी संकल्पना जोरकसपणे मांडली त्यात शिवसेनेच्या उद्धव ठाकरे यांनी गद्दारांना आसमान दाखवणार असल्याचे जाहीर केले, तर एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदासाठी हिंदुत्व सोडून काँग्रेस बरोबर जाणारे उद्धव ठाकरे हे बाळासाहेब ठाकरे यांची विचारा पैलू तोलूच शकत नाहीत, अशी गरज ओळखली पण तेच भाजपासोबत जाऊन मुख्यमंत्री कसे काय बनले, याचा उलगडा केला नसला तरी तुम्ही काय बोलता हे तरी तुम्हाला कळते का, या जनतेच्या प्रश्र्नाची उकल कोण करणार?

# आरोग्यासाठी योगा, पारंपरिक खेळ व वृक्ष लागवड काळाची गरज.

संयुक्त राष्ट्र परिषदेत प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी २१जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. त्यानंतर ११ डिसेंबर २०१४ ला संयुक्त राष्ट्र महासभेने दरवर्षी २१ जूनला जागतिक योग दिन म्हणून मान्यता देण्याचे मान्य केले आणि २१ जून २०१५ ला पहिले आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरे केल्या गेले.योगाला भारत सरकारने जागतिक दर्जा देवून भारताची मान जगात उंचावली आहे याचे मी स्वागत करतो.

योग व्यायामाचे आणि आरोग्याचे प्रभावशाली माध्यम असुन शरीरांच्या अवयवांचाच नव्हे तर मन,मेंदू आणि आत्म्याचे संतुलन ठेवण्याचे काम योगाच्या माध्यमातून होत असते.योग ही भारतातील ५ हजार वर्षे जुनी परंपरा असुन शारीरिक,मानसिक आणि आध्यात्मिक साधना आहे.त्यामुळे ऋषी–मुनी, तपस्वी यांनी योग संस्कृती अवलंबली होती.आरोग्य रक्षणासाठी योगा व व्यायाम अती आवश्यक आहे. अत्याधुनिक युगात व बदलत्या काळानुसार मानवजातीला मनमोकळे पणाने बागडण्या करीता जागा किंवा ग्राउंड अपुरे पडताना दिसतात.कारण आधुनिक युगात आपण कुठेही नजर फिरवली तर आपल्याला गगनचुंबी इमारती, कारखाने, उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात दिसुन येतात.अशा परीस्थितीत लहान–मोठी,आबाल–वृध्द खुल्या हवेत बागडु शकत नाही.परंतु शरीराला व्यायाम सुध्दा आवश्यक असतो.

अशा वेळेला आपण योगा,व्यायाम शाळा व जिमचा सहारा घेवून शरीराला सुदृढ ठेवण्याचा प्रयत्न सर्व करतात.पुर्वी अनेक मातीतील खेळ खेळले जायचे व जखमा सुध्दा व्हायच्या परंतु या जखमा त्याच मातीने दुरूस्त सुध्दा व्हायच्या.अशा परीस्थितीत शरीराच्या प्रत्येक अवयवांचा व्यायाम होत असे. परंतु कालांतराने मोबाईलच्या छंदामुळे संपूर्ण जुने छोटे–मोठे खेळ लुप्त होतांना दिसतात.परंतू शारिर सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी व्यायाम अती आवश्यक आहे.योगाच्या सहाय्याने आपण घरबसल्या व्यायाम करू शकतो.आज जगातील १९० देशांनी योगाभ्यास अंगीकारला आहे.यात अनेक मुस्लिम राष्ट्र सुध्दा आहेत.हा भारताचा मोठा मान आहे.कारण समाजातील प्रत्येक कुटुंबातील लहान–मोठे योगाभ्यास करून आपले आरोग्य सुदृढ ठेवु शकतो.आजच्या परिस्थितीत मुल पुढील भविष्याच्या वाटचालीकरीता अभ्यात मग्न असतात आणि मनोरंजनाचे साधन म्हणून भारतासह जगातील ८० टक्के जनता मोबाईलच्या व कांम्पुटरच्या आदीन झाल्याचे दिसून येते.यामुळे डोक्यावर तान येणे,डोळे दुखने,मेंदुवर परीनाम होने इत्यादी अनेक विकार मोबाईलमुळे व कांपुटरमुळे होतांना आपण पहातो.परंतु यावर निराकरण करण्याचे काम योगा करणे,व्यायाम करणे,जिमनॅस्टिक,किंवा जिमच्या माध्यमातून शरिरयष्टी सुदृढ ठेवने अत्यंत गरजेचे आहे.आपण योगाभ्यासचा विचार केला तर भारतात अनेक युगानु–युगापासुन योगाभ्यास ऋषी–मुनी,साधु–संत, महायोगी,तपस्वी इत्यादी अनेक महान विभूती झाडाखाली योगसाधना करायची. परंतु आज वाढते प्रदुषण,धावपळीचे जीवन, ग्लोबल वार्मिंग, वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण व बदलते हवामान यामुळे खुला व्यायाम करण्यास अनेक अडचणी निर्माण होतात.परंतु योगाभ्यास चार भिंतींच्या आत सुध्दा करता येतो.

त्यामुळेच जगातील अनेक देशांनी योगाभ्यासला जास्त महत्व दिले आहे. भारताने योगाला जागतिक पातळीवर नेऊन भारत योगगुरू बनला आहे.त्याचप्रमाणे भारताने योगाभ्यास जागतिक पातळीवर नेऊन जगाला व्यायामाची व शरिर सुदृढ ठेवण्याची मोठी दीशा देण्याचे काम सुद्धा केले आहे.भारत जागतिक पातळीवर लोकांचे जीवन उंचावण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील रहाला आहे.योग दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच योगाभ्यास अंगीकारला पाहिजे. योग दीनाच्या निमित्ताने प्रदुषणावर मात करण्यासाठी प्रत्येकांनी घर तीथे झाड ही मोहीम राबवुन या दीवसाला आगळेवेगळे ऐतिहासिक महत्व देवुन वृक्षारोपण केले पाहिजे. कारणआरोग्यासाठी वृक्ष ही सर्वांसाठी संजीवनी आहे. आपल्या राज्यात ३६ जिल्हे, प्रत्येकात साधारण ५ तालुके, म्हणजे १८० तालुके व राज्यात आमदार २८८ (वि.परिषदचे वेगळेच) वृक्षारोपण हा मुद्दा आमदार, कलेक्टर, बीडीओ,असे अनेक जबाबदार अधिकारी मिळून प्रशासनाने व सामाजिक संघटनांनी योग दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करायला हवी. जागतिक योग दिवस महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात साजरा होणार आहे. आजच्या परिस्थितीत ज्याप्रमाणे मनुष्याच्या आरोग्यासाठी योगाकरणे आवश्यक आहे.त्याच प्रमाणे ऑक्सिजनची मात्रा वाढविण्यासाठी वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे.याकडे मुख्यत्वेकरून प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.योग दिनाच्या निमित्ताने प्रशासने,शाळा, महाविद्यालये, एसटी स्टँड, संपूर्ण प्रशासकीय ठिकाणे, कारागृह या संपूर्ण ठिकाणी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण व्हायला हवे. यामुळे जागतिक विक्रम होईलच सोबत आरोग्याची जोपासना सुध्दा होईल.अशाप्रकारे योगासोबत आरोग्यासाठी वृक्षारोपण चळवळ पुढे नेली पाहिजे.कारण ह्या संपूर्ण बाबी आरोग्याशी निगडित आहे. योगाभ्यासमुळे शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक, आरोग्य आणि शांतीसाठी याचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळतो. त्यामुळेच जगातील १९० देशांनी योगाला स्विकारले आहे. भारतातच नाही तर संपूर्ण जगात वाढते नवीन–नवीन आजार चिंतेचा विषय आहे.

त्यामुळे योग साधना करून व्यायाम करणे तेवढेच आवश्यक आहे.कारण आरोग्य हिच संपत्तीहा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.योग दिनाच्या निमित्ताने केंद्र सरकारने व राज्य सरकारने राष्ट्रीय खेळांना महत्व देवून व्यायाम करण्याची प्रवृत्ती जागृत करण्याची गरज आहे. जगातील प्राचीन संस्कृती भारतात आताही आहे.त्यामुळे आपल्याला योग परंपरेच्या माध्यमातून ती पहायला मिळते. त्यामुळे आज योगाभ्यास जगासाठी अनमोल रत्न व संजिवनी सिध्द होत आहे. याचा भारतीयांना अभिमान आहे. योग दिनाच्या निमित्ताने ऑक्सिजनची मात्रा वाढवीन्यासाठी आपण सर्वांनी वृक्षारोपणाचा संकल्प करावयास पाहिजे. कारण पुर्वी ऋषी मुनी,तपस्वी,महाग्यानी झाडाखालीच योगाभ्यास करायचे, त्याचप्रमाणे पुर्वी शिक्षण सुध्दा झाडाखालीच व्हायचे यावरून स्पष्ट होते की वृक्षा शिवाय पुढचे पाऊल अवघड असते. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने व योग दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह भारतात जास्तीत जास्त वृक्षारोपण कसे करता येईल याकडे सरकारने व सामाजिक संघटनांनी लक्ष देण्याची गरज आहे. योगा करूया;व्यायाम करूया; वृक्ष लावुया; वृक्ष जगवुया आणि निसर्गाचा समतोल राखण्याचा संकल्प करूया.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# झरोका

एक – अमेरिका हा जगातील झुलता मनोरा आहे हे ज्ञात असतानाही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नादी का व कशासाठी लागले असतील हेच कळत नाही, डोकं बधीर झालंय.

दुसरा – अरे, तू काय बोलतो आहेस. ट्रम्प, मोदीजी संदर्भात काय टीप्पणी करतो आहेस हेच मला कळत नाही अवचित असे कांही घडले, घडविले गेले आहे काय ते स्पष्ट सांग ना ?

एक – अहो, भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी गेल्या अकरा वर्षात जगातील शंभरावर देशाचा दौरा केला असेल त्यात अमेरिका, चिन, पाकीस्तान संदर्भातील भेटी, चर्चा याला सिमाच नाही, नव्हती परंतू पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर लष्कराने सडेतोड उत्तरदेवूनपाक सरकार, पाक लष्करांना चारीमुंड्या चित्त केले हे यश लष्कराचेच आहे तसे असले तरी भारत सरकारने मोदी सरकारने मोदीमय वातावरण निर्माण केले. विरोधकानी संसदेत माहीती देण्याचा आग्रह केला तो कायम आहेच पण अमेरिकेच्या ट्रम्प याने मध्यस्थी केल्याने प्रधानमंत्री मोदीजीनी माघार घेतली शस्त्रबंदी जाहीर झाली त्यावर प्रतिक्रिया उमटल्या त्यानंतर अमेरिकेत ट्रम्प यानी चीन, पाकीस्तान बरोबर करार करुन कांही तरी दिले त्यापेक्षाही याच ट्रम्प यानी चक्क आय लव्ह पाकीस्तान असा संदेश जाहीर केला. तरी ही प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी कांहीच प्रतिक्रिया देत नाहीत म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, वेड्या, राष्ट्रीय स्वंयसेवक संघप्रणीत भाजपाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे कॉग्रेस मूक्त भारत, भ्रष्टाचार मूक्त भारत, महासत्ता भारत बनविण्यासाठी भ्रष्टाचारी, लूटारु लोकाना भाजपात प्रवेश देवून भारत महासत्ता बनवू पाहात असताना ट्रम्प काय करतो आहे ते पाहाण्यासाठी मोदीजीकडे वेल कोठे आहे, गप्प बस.

# काय बोलता राव ?

लातूर जिल्हा महिला राज म्हणून प्रत्ययास येतो आहे, सरपंच, सभापती, नगराध्यक्ष, तहसीलदार वगैरे पदावर महिलाच शासकीय, प्रशासकीय, नागरी कारभार हाकत आहेत. त्यातच जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, उपविभागीय महसूल अधिकारी रोहीणी नऱ्हे, मनपा आयुक्त मानसी मिना या कार्यरत असल्याने केवळ जिल्हापोलीस अधिक्षकपदी महिला नसली तरी सर्व कांही महिला राज कार्यरत असल्याने सर्वपक्षीय लोकप्रतिनिधीची असून अडचण नसून खोळंबा अशी अवस्था झाली आहे.

**काय बोलता राव !**

अरे, लातूर शहरच नव्हे तर सारा मराठवाडा कॉग्रेसमय होता, प्रशासकीय अधिकारी ही समतोलाने कार्यरत होते पण मागील पाच, दहा वर्षाच्या काळात भाजपा, कॉग्रेस अशी अंतर्गत यूती झाल्याने लातूरात शासकीय अधिकाऱ्याना कसरत करावी लागत होती. परंतू जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, घुगे यानी स्वतःचा वरदहस्त दाखवून अधिकारी रोहीणी नऱ्हे यानी साथ दिलीच पण मनपा आयुक्त मानसी मिना यानी तर मनपा कार्यालयीन आढावा बैठका, पाणीपूरवाठा यंत्रणा वगैरेना भेटी देवून पाहणी केली ते ही स्थानीक लोकप्रतिनिधीना बाजूला ठेवूनच हेच त्यांच्या कार्यपध्दतीचे गमक असावे, कारण कोणीही लोकप्रतिनिधी येवून मनपाला आढावा बैठकीच्या निमित्ताने त्रस्त करीत होते तो कार्यकाळ संपला अशीच लोकप्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे, मग बोला दाजीबा !




# समाजात विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात वैचारिक दृष्टीने समाज प्रबोधन करावे!

विश्र्वकर्मीय राज्यस्तरीय सुतार समाजात शालेय विद्यार्थ्यांचा गुणगौरव सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन राज्यातील विविध जिल्ह्यात विविध ठिकाणी करण्यात येत असते. परीक्षेत चांगल्या प्रकारे गुण मिळालेल्या प्राविण्य प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप द्यावी आणि त्यांचे अभिनंदन करावे तसेच विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देणे हा त्या मागचा उद्देश असतो.या गुणगौरव कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना समाजातील काही विशिष्ट लोकांकडून आकर्षक वस्तूंचे बक्षीस स्वरूपात विविध वस्तूंचे वाटप केले जाते त्याबद्दल सर्वांचे आयोजकांकडून मनः पूर्वक आभार आणि धन्यवाद मानले जातात. पण त्यासाठी शिक्षण संस्था कशी असावी तर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था बहुजन समाजाच्या मुलामुलींना शिका आणि कमवा हा संदेश ते सुरवात पासून देतात.

विश्र्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात विविध जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वैचारिक दृष्टीने आणि विकासात्मक दृष्टीने प्रगल्भ,परिपक्व आणि गुणवंत होण्यासाठी अनमोल मार्गदर्शन करण्यासाठी समाजातील सुशिक्षित, उच्चशिक्षित,उच्चविद्याविभूषित,विद्वान आणि हुशार,प्रतिभावंत,प्रभावशाली,प्रतिष्ठत विशेषतः शैक्षणिक क्षेत्रात सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या,शैक्षणिक क्षेत्रातील गाढे अभ्यासक असणाऱ्या लोकांना तसेच विविध क्षेत्रातील नामवंत लोकांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आदराने सन्मानाने आमंत्रित केले जाते आणि प्रमुख पाहुणे विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देतात सोबतच शैक्षणिक क्षेत्रातील समस्यांवर मार्गदर्शन करतात.

भावी पिढीच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणण्याऱ्या अशा विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात वैज्ञानिक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उन्नतीचा मार्ग शोधावे या बाबतीत मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.येणाऱ्या भावी तरुण पिढीचे वैचारिक नुकसान होऊ नये यासाठी व्यासपीठावर उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी आणि कार्यक्रमाच्या जबाबदार जाणकार आयोजकांनी यासाठी पुढाकार घ्यावा. संबंधित विभागातील, संबंधित जिल्ह्यातील बुद्धिमान,अभ्यासू,कर्तृत्ववान,दिग्गज अनुभवी समाज नेत्यांनी,बुद्धिप्रामाण्यवादी,बुद्धिवान तसेच स्वाभिमानी आणि धडाकेबाज,कर्तृत्ववान अशा युवक नेत्यांनी तसेच विविध पदावर सन्मानाने विराजमान असणाऱ्या जबाबदार,कर्तबगार,अभ्यासू पदाधिकाऱ्यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना शालेय जीवनात स्वाभिमानाने आणि अभिमानाने जीवन जगण्याचे मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.शालेय विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे मार्गदर्शन करतांना शिक्षणा बरोबरच आईवडीलांचे महत्व,स्वाभिमानाने,अभिमानाने जगण्याचे सुद्धा महत्व विद्यार्थ्यांना पटवून द्यावे.विद्यार्थी कसा असावा तर राजा मिलिंद सारखा तर शिक्षक कसा असावा तरभिख्खू नागसेन सारखा त्यासाठी तुम्हा मिलिंद प्रश्र्न हा महान ग्रंथ वाचवा लागेल.

विद्यार्थ्यांना स्वाभिमानाने जगण्याचा सल्ला देणे,शारीरिक,मानसिक,वैचारिक दृष्ट्या परिपक्व होणे,आपल्या जन्मदाते आईवडीलांची सेवा करणे त्यांची काळजी घेणे आपले जन्मदाते आईवडील हेच आपलं दैवत असून आईवडीलांपेक्षा कोणताही पुढारी मोठा नसून विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात असतांना आणि तारुण्य अवस्थेत असतांना सुद्धा स्वाभिमानाने जगावे कोणत्याही पुढाऱ्यांचे,नेत्यांचे लांगुलचालन,हांजी हांजी आणि मागेपुढे,उदोउदो अजिबात करु नये तरुणांनी अगोदर आपलं भविष्य उज्वल करण्यासाठी स्वतःचे आर्थिक उत्पन्नाचे साधन संसाधन निर्माण करण्यासाठी छोटा मोठा उद्योग व्यवसाय करण्यासाठी प्रयत्न करावा.

आपल्या शैक्षणिक गुणवत्तेच्या अनुभवानुसार एखादी नोकरी सुद्धा शोधावी कोणाच्याही मागे पुढे करण्यात आपला अमूल्य वेळ आणि ऊर्जा वाया घालवू नये असे परखडपणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे जेणेकरून आजच्या वयातील शालेय विद्यार्थी भविष्यात तरुण झाल्यानंतर स्वाभिमानाने नक्कीच जगायला शिकेल पर्यायाने आईवडीलांचे नाव मोठं करेल.आईवडीलांची खरी संपत्ती तर कमावता,आज्ञाधारक, सुसंकृत,उद्यमशील आणि व्यवहारी मुलगा आहे असं मी मानतो त्यासाठी समाजात विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात अशा वैचारिक दृष्टीने विविध विषयांवर समाज प्रबोधन करावे समाजात असे कार्यक्रम आयोजित करणारे बुद्धिमान विद्वान हुशार मंडळी समाजात भावी पिढी वैचारिक दृष्टीने परिपक्व घडविण्यासाठी विचार मंथन,समाज चिंतन करतील अशी अपेक्षा आहे.

**प्रमोद सूर्यवंशी :-८६०५५६९५२१.**
**चिखली,मातृतीर्थ बुलडाणा**

## योग ..

षट् दर्शनांतील एक
योगा महत्व वैदिक
योगाची ती अष्टांगे
खजिना अलौकिक

पुरातन भारतवर्षाने
शोधले योगमौक्तिक
ऋषिमुनींची देणगी
परिस स्पर्श लौकिक

स्वास्थ्य ठेवे स्वस्थ
फायदे दे शारीरिक
सोपे काही कठीण
व्यायाम प्रकार कैक

पंच योग प्रकारात
वारसाआध्यात्मिक
तन मनाशी जोडले
नाते असे भावनिक

अंतर्मनातजागृकता
वर्तन बनवे सात्विक
आधार शास्त्र शुध्द
अधिष्ठान रे तात्विक

योग साधना तपस्या
जरी असे पौराणिक
शिरोधार्ह शास्त्रअसे
जगता या आधुनिक

जात धर्म रंग विसरे
व्यायाम सामुदायिक
योगःचित्तवृत्तिनिरोधः
फलप्राप्ती हो दैहिक

युज् हे समाधि सूत्र
योग जुळवे सोयरिक
पाणिनी व्याकरणात
महत्वकळे सामुहिक

न दिलासा क्षणभंगुर
सुखे सोडावी ऐहीक
योग औषध व्याधीस
बालकडू हे बौद्धिक

योगास स्थान दैनिक
परिणाम अ लौकिक
साजरा करे सुखानंदे
योग दिवस रे वैश्र्विक

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## आवास योजनेतील घरकुलांच्या कामाना गती द्या

बुलडाणा, (जिमाका) दि. २०: प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा -२ व राज्य शासनाच्या आवास योजनेंतर्गत जिल्ह्यासाठी १ लाख २० हजाराहून जास्त घरकुलांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. उद्दिष्टानुसार जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करुन देण्यासाठी कामांना गती देण्याचे व घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी आज येथे दिले.

प्रधानमंत्री आवास योजना व विविध विकास योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडला. या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बि.एम. मोहन, संजय इंगळे तसेच गटविकास अधिकारी, कृषी सेवक व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

शहरी व ग्रामीण भागातील प्रधानमंत्री आवास योजनांच्या सद्यस्थिती व अंमलबजावणीची माहिती घेऊन प्रधान सचिव डवले म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाने जिल्ह्यासाठी मोठ्या प्रमाणात घरकुल मंजूर केले आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांकडून आवश्यक ती कारवाई पूर्ण करुन घरकुलाचे उद्दिष्ट पूर्ण करावे. आवास योजनांसाठी जमिनींच्या समस्या सोडविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशेष लक्ष घालावे. केंद्र व राज्य शासनाच्या आवास योजना वेळेत व पारदर्शक पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. गुणवत्ता आणि उत्तरदायित्व हाच जिल्हा परिषदेच्या कामकाजाचा पाया असायला हवा, असे प्रतिपादन एकनाथ डवले यांनी केले. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा एक व टप्पा दोनमध्ये जिल्ह्यात अपूर्ण घरकुलांची संख्या अधिक आहे. विविध कारणांमुळे विभागातील अपूर्ण असलेली घरकुले पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने जाणीवपूर्वक कशोशीने प्रयत्न करावे.

# ग्रामपंचायत भेंडखळ तर्फे जेष्ठ नागरिकांचा सत्कार.

उरण – उरण तालुक्यातील भेंडखळ ग्रामपंचायत ही वेगवेगळे उपक्रम राबविण्यात व शासनाच्या विविध योजना तळागाळात पोहचविण्यासाठी नेहमी अग्रेसर असते. जेष्ठ नागरिकांचा ग्रामपंचायतने सत्कार करून, त्यांच्याशी चर्चा करून त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. उरण तालुक्यातील भेंडखळ गावातील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार ग्रामपंचायत कार्यालय भेंडखळ येथे आयोजित करण्यात आला होता.सदर कार्यक्रम राबविताना गावातील जेष्ठ नागरिक महिला व पुरुष ३५० ते ३६० लोकांनी सहभाग घेतला होता. त्यांना ग्रामपंचायत तर्फे रजई, पिलो कव्हर,बेड शिट,छत्री वाटप करून त्यांचा सत्कार करण्यात आला.सदर सत्कार सरपंच मंजिता मिलिंद पाटील,उपसरपंच स्वाती संतोष पाटील, ग्रामपंचायत सदस्य दिपक दामोदर ठाकूर, अजित वासुदेव ठाकूर ,अभिजीत देवानंद ठाकूर, लिलेश्र्वर गजानन भगत, ग्रामपंचायत सदस्या सोनाली कौस्तुभ ठाकूर, शितल जीवन ठाकूर, स्वाती महेंद्र घरत ,संगीता मेघश्याम भगत ,अक्षता अनिल ठाकूर, प्राची अक्षय ठाकूर यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन करण्यात आला. ग्राम विकास अधिकारी किरण वसंत केणी यांनी प्रस्तावना करून गावातील ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन चांगल्या प्रकारे केले. यापुढेही असे कार्यक्रम केले जातील असे सरपंच मंजिता मिलिंद पाटील यांनी सांगितले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता कार्यालयीन कर्मचारी यांनी पण मोलाचे सहकार्य केले.एकंदरीत विविध उपक्रम राबवून शासनाच्या सर्वच योजना तळागाळात पोहचविणाऱ्या भेंडखळ ग्रामपंचायतने जेष्ठ नागरिकांचा सत्कार करून एक आगळा वेगळा उपक्रम राबविला आहे. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



**पत्रकार विठ्ठल ममताबादे – ९७०२७५१०९८,उरण,जिल्हा रायगड.**

# ५ वर्षांपेक्षा जास्त सेवा झालेल्या निदेशकांना नियमित करण्यासंदर्भात सकारात्मक कार्यवाही करावी - मंत्री मंगल प्रभात लोढा

मुंबई, : ज्या शिल्प निदेशकांनी ५ वर्षांपेक्षा जास्त काळ विभागामध्ये कार्य केले आहे, त्यांची परीक्षा घेऊन उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना नियमित करण्यात यावे, असे निर्देश कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालकांना दिले आहेत.

माजी मंत्री शोभा फडणवीस यांनी तासिका निदेशकांना नियमित करण्याबाबत मंत्री लोढा यांना पत्राद्वारे विनंती केली होती. यानंतर मंत्री लोढा यांनी या पत्राची तातडीने दखल घेत, संबंधित अधिकाऱ्यांना सकारात्मक चर्चा करून योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.



अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाने सुद्धा या संदर्भात मंत्री लोढा यांची सदर विषयाबाबत भेट घेतली. सद्य:स्थितीत अनेक औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये तासिका तत्वावर कार्यरत निदेशकांच्या रिक्त जागा मोठ्या प्रमाणात आहेत. तासिका तत्वावर काम करणाऱ्या निदेशकांची ५ वर्षे व त्याहून अधिक काळ ज्यांची सेवा झाली आहे किंवा किमान पात्रता (खढख, उढख, पदविका व पदवी) धारण करतात, त्यांची परीक्षा घेऊन नियमित करण्यात यावे, असे निवेदन महासंघाने दिले होते.

## श्री काशी महापीठाचे खेणी मातृशक्ती राष्ट्रीय तथा अन्य पुरस्कारांचे रविवारी लातुरात डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींच्या हस्ते वितरण

लातूर : श्री काशी महापीठाचे खेणी मातृशक्ती राष्ट्रीय पुरस्कार तसेच विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले असून या पुरस्कारांचे वितरण रविवार, दि. २२ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बाभळगाव रोडवरील ओम हामणे पॅराडाईज येथे कधी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींच्या हस्ते करण्यात येणार आहे. श्रीमती मालती महारुद्रप्पा खेणी यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा यावर्षीचा राष्ट्रीय मातृशक्ती पुरस्कार दोन वीरपत्नी माधुरी सचिन वनंजे नांदेड व दिपाली संदिप गायकर अहिल्यानगर यांना एक लक्ष रुपये रोख , गौरवपत्र, शाल श्रीफळ रोप व रुद्राक्ष माळ देऊन गौरविण्यात येणार आहे.



श्री जगद्गुरू विश्र्वाराध्य ज्ञान सिंहासन, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना श्री काशी जगद्गुरु डॉ चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. श्री ष ब्र १०८ शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज औसेकर व सद्गुरु हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम संपन्न होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारताचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भारत फोर्ज लि. पुणे या कंपनीचे अध्यक्ष बाबासाहेब नीळकंठराव कल्याणी व त्यांच्या सुविद्य पत्नी सुनीता बाबासाहेब कल्याणी व लातूरचे लोकप्रिय खासदार डॉ शिवाजी बंडप्पा काळगे हे उपस्थित राहणार आहेत.

तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आठ मान्यवरांना दहा हजार रुपये रोख रक्कम, गौरवपत्र, रूद्राक्ष माळ,शाल श्रीफळ व रोप देऊन गौरविण्यात येणार आहे. यामध्ये साहित्य पुरस्कार डॉ रविंद्र बेम्बरे नांदेड, आदर्श शिक्षक पुरस्कार तानाजी रोंगे , लातूर, कृतज्ञता पुरस्कार सिध्देश्र्वर म्हेत्रे सोलापूर, प्रज्ञा पुरस्कार मदिहा हक मोइनुल, सोलापूर, नाट्यकर्मी पुरस्कार सुनीता देशमुख, लातूर, किर्तनकार पुरस्कार न्यायवेंदाताचार्य मारूत महाराज तुणतुणे, सोलापूर , समाज सेवा पुरस्कार नलिनी चिरणे, पुणे व पत्रकारिता पुरस्कार प्रा. रामेश्र्वर बद्दर, लातूर यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमास लातूरकर बंधु भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सिध्दया स्वामी हिरेमठ ,एड गंगाधरप्पा हामणे,प्रा मन्मथ पंचाक्षरी, बसवंतप्पा भरडे, डॉ अनिल सर्जे, भालचंद्र मानकरी, बाबुराव वडगावे, राजेंद्र बलसुरे, ओमप्रकाश झुरळे , श्रीकांत हिरेमठ, रामलिंग ठेसे, एड उमाशंकर पाटील,शिवकांत स्वामी आदींनी केले आहे.

## नियोजीत रस्ता सोडून शेतकऱ्याच्या शेतातून तयार होतोय पाणंद रस्ता

लातूर : ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य शासनाचा महत्वाकांक्षी मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना अधिक प्रभावी आणि पारदर्शकपणे राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने अहमदपूर तालुक्यातील चिखली येथे नरेगा विभागांतर्गत ग्राम पंचायत पांदण रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र उपलब्ध असलेला रस्ता सोडून माझ्या मुलाच्या नावे असलेल्या गट क्रमांक ५६४ मधून सदर रस्त्याचे काम केले असल्याचा गंभीर आरोप प्रल्हाद निवृत्ती कराड यांनी केला आहे.



यासंबंधीची रितसर तक्रार कराड यांनी ग्राम पंचायत कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, तहसीलदार, उप जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने शेत रस्ते/पाणंद रस्ते महत्वाचे ठरले आहेत. मात्र ही कामे, दर्जेदार, पारदर्शक, तंटाविरहित करण्यात यावेत असे शासनाचे सक्त निर्देश असताना रस्ता सोडून शेतकऱ्याच्या शेतातून पाणंद रस्ता तयार होत असलेला हा अजब प्रकार चिखली येथे घडला आहे. सदर रस्त्याची हद्द कायम करून माझ्यावर झालेला अन्याय दूर करावा अन्यथा मला कुटुंबियांसमवेत उपोषण करण्याशिवाय पर्याय नाही असा इशारा कराड यांनी दिला आहे.

गेल्या दोन महिन्यापासून यासाठी मी चिखली, अहमपूर, लातूर येथील शासकीय कार्यालयात पाठपुरावा करीत आहे मात्र कुणीही प्रतिसाद देत नसल्याची खंत वयोवृद्ध शेतकरी प्रल्हाद कराड यांनी व्यक्त केली आहे.

# एआय आधारित शेती म्हणजे सरकार आणि सहकारकडून शेतकऱ्यांची निव्वळ फसवणूक

लातूर (प्रतिनिधी) : एआय आधारित शेती म्हणजे सरकार आणि सहकार यांची मिलिभगत असून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना लुटण्यासाठी केलेली फसवणूक आहे. असा परखड घणाघात शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी लातूर येथील पत्रकार परिषदेत केला.



रघुनाथदादा पाटील शेतकऱ्यांच्या कर्जमुक्ती, एआय आधारित शेती सह विविध प्रश्नावर राज्यभर शेतकऱ्यांची जनजागृती करीत आहेत. त्यानिमित्त ते आज लातूरमध्ये आले होते. यावेळी शासकीय विश्रामगृह येथे आयोजीत पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

याप्रसंगी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट, क्रांतिसिंह नाना पाटील ब्रिगेडचे राज्य अध्यक्ष शिवाजी नादखिले, लक्ष्मण पाटील, राजकुमार सोमवंशी, लातूर जिल्हाध्यक्ष गजानन बोलंगे आदींची प्रमुख उपस्तिथी होती.

रघुनाथदादा पाटील यांनी महाराष्ट्राची अधोगती झाल्याचे सांगून सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणावर कडाडून टीका केली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ५० हजार रुपये कर्ज देऊन आधीच कर्जात असलेल्या शेतकऱ्यांना अधिक कर्जबाजारी करणे. आणि एकरी २०० टन उत्पादनाचे आश्र्वासन दिले आहे. त्यासाठी राज्य सहकारी बँक ५०० कोटी रुपये देण्यास तयार झाली आहे. आमचे म्हणणे आहे, शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांची जमीन घ्या आणि आम्हाला निम्मे उत्पन्न द्या. सरकारचा हा निर्णय म्हणजे बारामतीची भानामती महाराष्ट्रवर लादन्याचा प्रकार आहे. कर्जमाफीबद्दल बोलताना ते म्हणाले, आम्हाला कर्जमाफी नाही कर्जमुक्ती हवीय. पुन्हा कर्ज होऊ नये अशी व्यवस्था पाहिजे. आधीच्या मुंगंटिवार समितीचे काय झाले, समिती नेमायची शेतकऱ्यांना फसवायचे हे एकमेव काम सुरु आहे. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव नाही, तुम्ही उत्पादन खर्चही देत नाहीत. दूध भेसळ का थांबत नाही, दूध संघावर कारवाई का होत नाही. शेतकऱ्यांची लूट करणाऱ्या बाजार समित्यावर कारवाई होत नाही. साखर कारखानदारीतही तसेच आहे. त्यामध्येही कायदे बदलले. एफआरपी आणला, त्यात उसाला भावच नाही. वन्य प्राण्यांचा कायदा बदलला, त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत आहे. गोवंश हत्या बंदिमुळे शेतकऱ्यांनी भाकड जनावरांचे करायचे काय, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सहकार क्षेत्रातील आणि सरकारमधील हे सगळे लुटारू आहेत. त्याच्या चोऱ्यावर पांघरून घालणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जबाबदार आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आम्ही जनजागृती करत आहोत. शेतकऱ्यांनी कोणतेही कर्ज, वीजबिल किंवा कर भरू नये असे आवाहन रघुनाथ दादा पाटील यांनी शेवटी केले.

# इतिहासात आजचा दिवस २१ जून २०२५

अंतरराष्ट्रीय
१७४९ – कॅनडाच्या नोव्हा स्कॉशिया प्रांतात हॅलिफॅक्स शहराची स्थापना.
१७८८ – न्यू हॅम्पशायर अमेरिकेचे नववे राज्य झाले.
१८७७ – पेनसिल्व्हेनियात १० कामगार नेत्यांना फाशी देण्यात आली.
१८९८ – गुआम अमेरिकेचा प्रांत झाला.
१९४० – दुसरे महायुद्ध – फ्रांसने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४२ – दुसरे महायुद्ध – जर्मन सैन्याने टोब्रुक जिंकले.
१९४५ – दुसरे महायुद्ध – ओकिनावाची लढाई संपली.
१९६४ – अमेरिकेत मिसिसिपी राज्यात समान हक्कांसाठी आंदोलन करणाऱ्या ३ व्यक्तींना कु क्लुक्स क्लॅन ठार मारले.
१९७५ – वेस्ट इंडीझने पहिला क्रिकेट विश्वचषक जिंकला.
१९८९ – अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने देशाचा ध्वज जाळण्याची कृती ही वाचास्वातंत्र्याची अभिव्यक्ती असल्यामुळे वैध ठरवली.
२००४ – स्पेसशिपवन या पहिल्या खाजगी अंतराळयानाचे पहिले उड्डाण.
२००८ – कॅनडात १५० वर्षानंतर क्रिकेटला पुन्हा राष्ट्रीय खेळ घोषित करण्यात आले.
राष्ट्रीय
१६७४ – 'श्री शिवराज भूषण' या काव्याचे लेखन कवी भूषण यांनी पूर्ण केले.
१९३४ – पुणे येथे महात्मा गांधी यांच्या हस्ते 'हिंदी प्रचार संघ' या संस्थेची स्थापना.
१९९१ – भारताच्या पंतप्रधानपदी पी.व्ही.नरसिंह राव.
२००६ – गोव्यात इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषय अनिवार्य करण्यात आले.
२००७ – भारतात पहिल्यांदाच झालेल्या जागतिक कराटे स्पर्धेत सहा वर्षीय गणेशने सुवर्ण पदक जिंकले.
२००७ – कोट्यवधी रूपयांच्या मुद्रांक घोटाळ्यातील प्रमुख आरोपी अब्दुल करीम तेलगी याच्यासह दोन डॉक्टरांना विशेष न्यायालयाने सात वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठाविली.
२००८ – प्रसिद्ध निर्माता–दिग्दर्शक तपन सिन्हा यांना भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्यावतीने जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
जन्म
१००२ – पोप लिओ नववा याचा जन्म.
१२२६ – बोलेस्लॉस पाचवा, पोलंडचा राजाचा जन्म.
१७३२ – योहान क्रिस्चियन बाख, जर्मन संगीतकारचा जन्म.
१७८१ – सिमिओन–डेनिस पॉइसॉन, फ्रेंच गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञाचा जन्म.
१९०५ – ज्याँ–पॉल सार्त्र, फ्रेंच लेखक व तत्त्वज्ञानीचा जन्म.
१९२३ – सदानंद रेगे, मराठी कवी, कथाकार आणि अनुवादकचा जन्म.
१९३७ – जॉन एडरिच, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.
१९५३ – बेनझीर भुत्तो, पाकिस्तानची पंतप्रधानचा जन्म.
१९५४ – जेरेमी कोनी, न्यूझीलंडचा क्रिकेटपटूचा जन्म.
१९५५ – मिशेल प्लाटिनी, फ्रेंच फुटबॉल खेळाडूचा जन्म.
१९८२ – विल्यम, इंग्लिश राजकुमारचा जन्म.
निधन
१३०५ – वेंकेस्लॉस दुसरा, पोलंडचा राजाचे निधन.
१३७७ – एडवर्ड तिसरा, इंग्लंडचा राजाचे निधन.
१५२७ – निकोलो माकियाव्हेली, इटलीचा राजकारणी, इतिहासकारचे निधन.
१८७४ – अँडर्स योनास अँग्स्ट्रॉम, स्वीडीश भौतिकशास्त्रज्ञाचे निधन.
१८९३ – लिलँड स्टॅनफोर्ड, अमेरिकन उद्योगपती; स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीचा संस्थापकाचे निधन.
१९२८ – नाथमाधव तथा द्वारकानाथ माधव पितळे, मराठी कादंबरीकारचे निधन.
१९५७ – योहान्स स्टार्क, जर्मन भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेताचे निधन.
१९७० – सुकर्णो, इंडोनेशियाचा राष्ट्राध्यक्षाचे निधन.
१९८४ – अरुण सरनाईक, मराठी चित्रपट अभिनेताचे निधन.
१९८५ – टेग अर्लँडर, स्वीडनचा पंतप्रधानाचे निधन.
प्रतिवार्षीक पालन
उत्तर गोलार्धातील सर्वात मोठा दिवस.
दक्षिण गोलार्धातील सर्वात छोटा दिवस.
स्थानिक रहिवासी दिन – कॅनडा.
राष्ट्र दिन – ग्रीनलँड.

## सीईटी परीक्षेत बाभळगाव कनिष्ठ महाविद्यालयाची उत्तुंग भरारी

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे सीईटी २०२५ च्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्तुंग भरारी घेऊन महाविद्यालयाचा गुणवत्तेचा आलेख चढता ठेवला आहे. या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयात एका विशेष कार्यक्रमात करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे परीक्षा प्रमुख प्रा. हरिहर गायके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी पीसीबी ग्रुप मधून पाटील अजिंक्य सुनील यांनी ९१.२९ गुण घेऊन महाविद्यालयात सर्वप्रथम येण्याचा मान पटकावला. याच ग्रुपमधून थाटे साक्षी शिवदास ७४.२३ तर पीसीएम ग्रुप मधून पाटील अजिंक्य सुनील -८६.९६, थाटे श्रद्धा चंद्रकांत ७९.३७, कदम अभिजीत सुरेश ७९.७९, गायकवाड अमित बाळासाहेब ७४.५३ जाधव संपदा राजकुमार ७४.९१, सांडूर श्रुती संतोष, सांडूर गौरवी, शेख उनुसा चाँदपाशा, पवार स्वाती विनायक, गायकवाड कोमल रमेश यांचा महाविद्यालयामध्ये प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

# आत्मशुध्दीसाठी विवेकपूर्ण ध्यान (जागतिक योग दिन)

२१ जून या दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन'साजरा करण्यासाठी निवडण्यामागे खास कारण आहे. २१ जून हा वर्षात सर्वात मोठा दिवस मानला जातो, ज्याला 'उन्हाळी संक्राती'असे म्हटले जाते. उन्हाळी संक्रांती हा उत्तर गोलार्धातील सर्वात जास्त प्रकाश असलेला दिवस आहे. पृथ्वीचा अक्ष त्याच्या कमाल कोनात सूर्याकडे झुकतो, त्यामुळे दिवस मोठा होतो. २१ जूननंतर सूर्य दक्षिणायनात प्रवेश करतो. योग आणि अध्यात्मासाठी हा दिवस खूप खास मानला जातो. त्यामुळे २१ जून रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. जगभरात योगाचा प्रसार करण्यासाठी आणि त्याच्या फायद्यांची जाणीव करून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत केलेल्या भाषणात पंतप्रधानांनी योगाचे महत्त्व सांगितले होते. ''योग ही भारताच्या प्राचीन परंपरेने दिलेली एक अमूल्य देणगी आहे. योग मन व शरीर, विचार व कृती, संयम व पूर्णता, मनुष्य व निसर्ग यांच्यातील ऐक्याला मूर्त रूप देतो. आरोग्य व स्वत:च्या कल्याणसाठी सर्वांगीण दृष्टिकोन प्राप्त करून देतो. योगासने हा केवळ एक व्यायाम नाही, तर स्वत:शी, जगाशी आणि निसर्गाशी एकरूपतेची भावना शोधण्याचा मार्ग आहे. आपली जीवनशैली बदलून आणि चेतना निर्माण करून आरोग्य सुधारण्यासाठी आंतरराष्ट्रीय योग दिन स्वीकारण्याच्या दिशेने काम करू या,'' पंतप्रधानांच्या या भूमिकेनंतर संयुक्त राष्ट्रांतील विविध देशांनी योगांचे महत्त्व जाणून हा दिवस साजरा करण्यास मान्यता दिली.

योग एक पूर्ण विज्ञान आहे, एक पूर्ण जीवन शैली आहे, एक पूर्ण चिकित्सा पद्धती आहे आणि एक पूर्ण अध्यात्म विद्या आहे. योगाच्या लोकप्रियतेचे रहस्य हे आहे की लिंग, जाति, वर्ग, संप्रदाय, क्षेत्र आणि भाषाभेदांच्या संकीर्णतांमध्ये कधी आबद्ध न असणे होय. चिंतक, बैरागी, अभ्यासी, ब्रह्मचारी, गृहस्थ कोणीही याचे सानिध्य प्राप्त करून लाभांन्वित होऊ शकतात. व्यक्तींच्या निर्माणात आणि उत्थानामध्येच नाही तर परिवार, समाज, राष्ट्र आणि विश्वाच्या चहूमुखी विकासामध्येही याचा उपयोग सिद्ध झाला आहे. योग मनुष्याला सकारात्मक चिंतनाच्या प्रशस्त मार्गावर आणण्यासाठी एक अद्भुत विद्या आहे, ज्याला हजारो वर्षापूर्वी भारताच्या प्रज्ञावान ऋषि-मुनींनि आविष्कृत केले होते. महर्षि पतंजलीनी अष्टांग योगच्या रूपात याला अनुशासनबद्ध, संपादित आणि निष्पादित केले. जेव्हा मनाला एकाग्र करून ध्यानावस्थित रूपात जीव परमात्म्याबरोबर मिलनाची आकांक्षा करत असते तोच योग आहे. योगासनांना आधुनिक



जीवनात फक्त व्यायामच मानले जाते. इंग्रजीमध्ये याला योगच्या ऐवजी 'योगा' संबोधिले जाते.

योगाचे कित्येक प्रकार शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक हालचालींना आपल्या ताब्यात ठेवतात ज्यांचा उद्देश असतो की मनुष्याला आपल्या स्वरूपाच्या बाबतीत ज्ञान मिळवणे हेच मानव जीवनाचे परम लक्ष्य मोक्ष प्राप्त करणे. योग वैदिक तत्त्वशास्त्रात सहा विचारधारांमध्ये दर्शनांमध्ये एक आहे. इथे याचे तात्पर्य राजयोगाबरोबर आहे. तो एक ब्रह्मन मिळविण्यासाठी ईश्वरीय ध्यानाचा राजसी मार्ग आहे. हिंदू संस्कृतीत योगाचे कित्येक प्रकारपण आहेत, उदा. निष्काम कर्म योग, आत्महित विहीन भक्ति योग आणि ज्ञान योग (विवेकपूर्ण ध्यान). जागतिक योग दिन हा योगास मान्यता देणारा एक दिवस आहे, जो २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने स्वीकारल्यानंतर दरवर्षी २१ जून रोजी जगभरात साजरा केला जातो. मानसिक तंदुरुस्ती, प्राचीन भारतात उगम पावलेल्या या निरोगीपणाच्या प्रथेचा जागतिक स्तरावर प्रचार करणे संयुक्त राष्ट्रांनी महत्त्वाचे मानले होते. भारतीय धर्म संस्कृतीमधील 'योग' संकल्पनेची मांडणी श्रीमद्भगवद्गीता ग्रंथात केलेली आहे. त्याच जोडीने पतंजली मुनी यांनी आपल्या योगसूत्राद्वारे मानवाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासाची संकल्पना स्पष्ट केली आहे. याद्वारे आध्यात्मिक उन्नतीही साधता येते असे पातंजल योगसूत्र ग्रंथात सांगितले आहे. जगभरातून स्वीकारले गेलेले भारतीय संस्कृतीतील योगाचे महत्त्व अधोरेखित होण्याचे प्रयत्न या दिवसाच्या निमित्ताने होते. योग हा शब्द संस्कृत युज् या धातुपासून तयार झाला आहे. पाणिनी व्याकरणामध्ये युज् समाधौ असे सूत्र आहे. योग या शब्दाचा अर्थ 'जोडणे, एकत्र आणने, जुळवणे' असा अनेक प्रकारे होतो.

योगावर पतंजली मुनींनी जवळजवळ इ.स.पू. १५० मध्ये योगसूत्र लिहिले. पतंजलींच्या अनुसार अष्टांग योगाचे पालन करणारी व्यक्ति आपल्या मनाला शांत करू शकते आणि शाश्वत ब्रह्मात सामावू शकते. याच अष्टांग पथा ने नंतर येणाऱ्या राज योग, तंत्रयोग आणि बौद्ध (वज्रयान) योगाचा पाया घातला. दोन वर्षात या उपक्रमाने चळवळीचे रूप घेतले आहे. १८ जून रोजी ऑस्ट्रेलियन संसदेमध्ये माजी पंतप्रधान टोनी अबॉट यांच्या उपस्थितीत योगसत्र झाले. स्वत: अबॉट यांनी यावेळी योगासने केली. दरवर्षी एक विशेष थीम लक्षात घेऊन योग दिनाचे आयोजन केले जाते. यंदा म्हणजे २०२५ या वर्षीची थीम ''एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग'' आहे. या थीमचा अर्थ असा आहे की, आपल्या सर्वांचे आरोग्य या पृथ्वीच्या आरोग्याशी जोडलेले आहे. जेव्हा पृथ्वी निरोगी असेल तेव्हा मानव देखील निरोगी असतील. योग हा दुवा मजबूत करण्यास मदत करतो. हे अधोरेखित करण्यासाठी ही थीम निवडण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, या जागतिक उत्सवाचा ११ वा वर्धापन दिन आहे. 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' या थीम अंतर्गत या वर्षीचा कार्यक्रम समग्र कल्याण आणि पर्यावरणीय सुसंवाद वाढविण्यात योगाच्या महत्त्वाच्या भूमिकेवर प्रकाश टाकतो.

२०१५ मध्ये पहिल्यांदा योग दिन साजरा करण्यात आला, त्यावेळी थीम होती, 'सुसंवाद आणि शांततेसाठी योग'. त्याच्याच पुढील वर्षी म्हणजे २०१६ मध्ये 'शाश्वत विकास उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग'अशी थीम होती. २०१७ मध्ये 'आरोग्यासाठी योग', २०१८ मध्ये 'शांततेसाठी योग', २०१९ मध्ये 'हृदयासाठी योग', २०२० मध्ये 'घरी आणि कुटुंबासह योग', २०२१ मध्ये 'निरोगीपणासाठी योग', २०२२ मध्ये 'मानवतेसाठी योग', २०२३ मध्ये 'वसुधैव कुटुंबकमसाठी योग' सर्वांच्या कल्याणासाठी योग, हे दर्शविण्यासाठी ही थीम निवडण्यात आली होती. गेल्या वर्षी म्हणजेच २०२४ मध्ये 'महिला सक्षमीकरणासाठी योग' अशी थीम ठेवण्यात आली होती. या मध्यवर्ती कल्पनेसह महिलांचे मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य वाढवण्यावर भर दिला गेला होता. महिलांचे सर्वांगीण कल्याण वाढविण्यात आणि परिवर्तनात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. हे अधोरेखित करण्यासाठी ही थीम निवडण्यात आली होती. हा दिवस महिलांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकासातील प्रगती साजरी करेल, असा विश्वास ही थीम निवडतांना व्यक्त करण्यात आला होता. संयुक्त राष्ट्रसंघाचा ठराव स्वीकारल्यानंतर, भारतातील आध्यात्मिक चळवळीतील अनेक नेत्यांनी या उपक्रमाला पाठिंबा दर्शविला. आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक रविशंकर यांनी मोदींच्या प्रयत्नांचे कौतुक करतांना म्हटले आहे की, ''कोणत्याही तत्वज्ञान, धर्म किंवा संस्कृतीला राज्याच्या संरक्षणाशिवाय जगणे फार कठीण आहे. योग आतापर्यंत जवळजवळ अनाथाप्रमाणे अस्तित्वात आहे. आता, अधिकृत मान्यता. यूएन योगाच्या फायद्याचा आणखी प्रसार करेल.''

११ डिसेंबर २०१४ रोजी भारताचे स्थायी प्रतिनिधी अशोक मुखर्जी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत मसुदा ठराव सादर केला. मसुदा मजकूराला १७७ सदस्य राज्यांकडून व्यापक समर्थन मिळाले ज्यांनी मजकूर प्रायोजित केला, जो मताशिवाय स्वीकारला गेला. या उपक्रमाला अनेक जागतिक नेत्यांचा पाठिंबा मिळाला. एकूण १७७ राष्ट्रांनी हा ठराव सह-प्रायोजित केला, जो अशा स्वरूपाच्या ठरावासाठी आतापर्यंतची सर्वाधिक सह-प्रायोजकांची संख्या आहे. भारतीय कॅलेंडरमध्ये, उन्हाळी संक्रांती दक्षिणायनामध्ये संक्रमण दर्शवते. उन्हाळ्यातील संक्रांतीनंतरची दुसरी पौर्णिमा ही गुरु पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. हिंदू पौराणिक कथांमध्ये, शिव, पहिला योगी (आदि योगी), या दिवशी उर्वरित मानवजातीला योगाचे ज्ञान देण्यास सुरुवात केली आणि ते पहिले गुरु (आदि गुरु) बनले असे म्हटले जाते. निरोगी तन आणि शांत मन याची गुरुकिल्ली म्हणजेच योग, त्यानिमित्त सर्वांना जागतिक योग दिनाच्या खुप खुप शुभेच्छा !!

प्रविण बागडे
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# राशिभविष्य २१ जून २०२५

मेष : शुभ रंग: पीवळा, शुभ दिशा:पश्चिम
रचनात्मक कामात यश मिळेल. आर्थिक योग उत्तम आहे. कुटुंबातील व्यत्तिंच्ये सहकार्य घ्या. प्रभावी वातावरणाचा उपयोग होईल. अती उत्साहीपणा दाखवू नका.

वृषभ: शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर
आपले प्रयत्न आज सफल होतील. व्यापारात योग्यवेळी घेतलेला निर्णय फायदेशीर राहील. शिक्षणात यश मिळेल. वेळेचा दुरूपयोग करू नका.

मिथुन: शुभ रंग काळा, शुभ दिशा:पश्चिम
कामकाजामध्ये वाढ होईल अनकुल स्थिती राहणार आहे. वेळेचा चांगला उपयोग करून आपल्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामकाजाला सुरूवात करा. विचारपूर्वक निर्णय घ्या.

कर्क : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: पश्चिम
वाद विवाद संपुष्टात येतील. नौकरी करणाऱ्यांना मनासारखी बढती, बदली होण्याची शक्यता आहे. सामाजिक कार्य करीत असल्यामुळे मान सन्मान मिळेल.

सिंह: शुभ रंग: लाल, शुभ दिशा : पूर्व
भांडण, वादविवादामुळे मानसिक ताण वाढेल. आर्थिक स्थिती मध्यम राहील. पारिवारीक सहकार्याने कामात यश मिळेल.

कन्या: शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा:पूर्व
व्यावसायिक योजना गुप्त ठेवा. देण्या घेण्याच्या व्यवहारात सावधपणा ठेवा. मुलांच्या बाबतीत काळजी वाटेल. देवाधर्मावरील विश्वास वाढेल.

तुळ: शुभ रंग : केसरी, शुभ दिशा: उत्तर
बौद्धीक अडचणी दूर होतील. प्रगतीचे मार्ग मोकळे होतील. फायदेशीर प्रवास होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील वयस्कर व्यक्तींच्या प्रकृतीची काळजी घ्या. व्यावसायामधील वादापासून दूर रहा.

वृश्चिक: शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण
नातेवाईकांशी असलेल्या संबंधात मर्यादा राखा. व्यापारात नवीन संधी मिळतील. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. कौटुंबिक समस्या दूर होईल.

धनु: शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण
व्यवसायामध्ये अनकूल अशी सफलता मिळेल. येणाऱ्या खर्चामुळे चिंतेत रहाल. खर्चामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

मकर : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पश्चिम
कौटुंबिक समस्यामध्ये लक्ष राहणार नाही. अनिश्चितेमुळे वैचारिक धाडसामध्ये कमतरता राहील. व्यापारात कोणावरही विश्वास दाखवू नका. कर्ज घेण्याची वेळ येऊ शकते.

कुंभ: शुभ रंग: काळा: शुभ दिशा:पश्चिम
कौटुंबिक समस्या आणि स्थावर मालमत्ता या संबंधीतील समस्या दूर होतील. समाजात प्रतिष्ठा मिळाल्याने आनंदी रहाल. कोणाचाही द्वेष करू नका.

मीन : शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर
मुलांच्या प्रगतीमुळे मन प्रसन्न राहील. आर्थिक आवक चांगली राहील. वाचनाची गोडी वाढेल. राहण्यासाठी घराची चिंता दूर होईल.

# असा असतो मलेरियाचा ताप, या लक्षणाकडे लक्ष न दिल्यास मृत्यूचा धोका

देशभरात डेंग्यूच्या वाढत्या रुग्णांदरम्यान मलेरियाच्या रुग्णांमध्येही वाढ होऊ लागली आहे. मलेरियाचा ताप हा डास चावल्यामुळे होतो.



मलेरिया पसरवण्यासाठी अनेक परजीवी जबाबदार असतात. यापैकी सर्वात धोकादायक प्लास्मोडियम फॅल्सीपेरम आहे. हे इतके धोकादायक आहे की यामुळे मृत्यू देखील होतो. जर तुम्हाला सौम्य ताप, तीव्र डोकेदुखीसह थंडी वाजत असेल, तर मलेरियाच्या या धोकादायक प्रकाराची ही लक्षणे आहेत. ही लक्षणे दिसल्यास ताबडतोब रुग्णालयात जावे. या प्रकरणात निष्काळजीपणा जीवघेणा ठरू शकतो. मलेरियाची लागण झालेल्या व्यक्तीलाही एकाच वेळी दोन परजीवींचा संसर्ग होऊ शकतो, ही चिंतेची बाब आहे.

अशीच एक घटना नोएडामध्ये समोर आली आहे, जिथे प्लाझमोडियम वायवॅक्स सोबत मलेरियाचा सर्वात धोकादायक परजीवी प्लास्मोडियम फाल्सीपेरम देखील एका व्यक्तीमध्ये आढळून आला आहे. सध्या रुग्णाची तपासणी सुरू आहे. डॉक्टरांचे म्हणणे आहे की हजारो रुग्णांपैकी केवळ एका रुग्णामध्ये असे प्रकरण आढळतात. परंतु एकाच वेळी दोन संसर्ग होणे हे चिंतेचे कारण आहे. अशा परिस्थितीत लोकांनी मलेरियापासून स्वत:चा बचाव करणे गरजेचे आहे. या महिन्यांत मलेरियाच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याने कोणत्याही प्रकारच्या तापाला हलके घेऊ नका. स्वत: औषध घेणे टाळा आणि उपचार घ्या.

याबाबत तज्ज्ञ स्पष्ट करतात की मलेरियाचा ताप ॲनोफिलीस डास चावल्यामुळे होतो. जेव्हा हा डास माणसाला चावतो, तेव्हा प्लास्मोडियम बॅक्टेरिया शरीरात प्रवेश करतो. हळूहळू ते शरीरात वाढू लागते. दोन-तीन दिवसांनी ताप येऊ लागतो आणि हा जीवाणू शरीराच्या वेगवेगळ्या भागांवर प्रभाव दाखवू लागतो. मलेरियाची लक्षणे वेळीच ओळखली गेली नाहीत, तर रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो.

मलेरियाच्या बाबतीत सुरुवातीला ताप येतो, घाम येणे सुरू होते आणि थोडीशी थंडीही जाणवते. ही त्याची सुरुवातीची लक्षणे आहेत. जर तुम्हाला ही समस्या येत असेल तर, मलेरियाची ताबडतोब चाचणी करा. या तापाची पुष्टी झाल्यास त्वरित उपचार करा.

कसा रोखायचा मलेरिया

घराभोवती पाणी साचू देऊ नका
स्वच्छतेची काळजी घ्या
घरात कीटकनाशकांची फवारणी करा
पूर्ण बाही असलेले कपडे घाला

# उपदेशकथा, विश्वासाचा सुगंध

चित्तरंजन हे अतिशय हुशार परंतु कट्टर नास्तिक गृहस्थ म्हणून सर्वजण त्यांना ओळखत. म्हणूनच सहदेव महाराजांच्या कीर्तनाला त्यांना आलेले पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. सहदेव महाराज तर धर्माची, ईश्वराच्या अस्तित्वाची महती सांगणारे. आणि अशा धार्मिक विषयाशी संबंधित कार्यक्रमाला चित्तरंजन कसे काय आले ? हे कसे काय शक्य आहे ? म्हणून सर्वत्र मित्र काहीसे अचंबितच झाले. त्यांच्यापैकी एकाला न राहवल्याने त्याने अखेर चित्तरंजन यांना विचारलेच, '' भक्तिमार्गाची प्रवचने, कीर्तने ऐकायला जाणे आपल्याला पटते का ? आपल्या तत्त्वात ते बसते का ? नसेल तर आज येथे येण्याचे कारण काय ?''

चित्तरंजन म्हणाले, '' त्याचे असे आहे की, सहदेव महाराज आपल्या प्रवचनात जे सांगतात, त्यावर माझा मुळीच विश्वास नाही. परंतु आपण जे जे बोलतो, त्यावर महाराजांचा दृढ विश्वास आहे. आणि ज्याचा स्वत:च्या बोलण्यावर दृढ विश्वास आहे, अशा व्यक्तीचे बोलणे समजून घ्यायला मला आवडते.''

# चौकशी अहवालात आरोप निश्चितीनंतर तेलगोटेंवर कारवाई होणार का?

नागपूरः भंडारा येथे सहाय्यक आयुक्त असताना सुकेशिनी तेलगोटे यांच्या कार्यकाळात क्रीडांगण विकास योजनेंतर्गत ६५ लाख रुपयांचे कंत्राट देताना वित्तीय अनियमितता झाल्याचा ठपका चौकशी समितीच्या अहवालात ठेवण्यात आला आहे. हा अहवाल प्रभारी प्रादेशिक उपायुक्त सिद्धार्थ गायकवाड यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. त्यामुळे आता अहवाल बदलवला जाणार की, तेलगोटेंवर कारवाई होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

तत्कालीन प्रादेशिक उपायुक्त बाबा देशमुख यांनी लेखाधिकारी किरण चांदेकर यांच्या अध्यक्षतेखाली एप्रिल २०२५ मध्ये सहा सदस्यांची चौकशी समिती नेमली. समितीने १५ मे २०२५ ला प्रादेशिक उपायुक्तांकडे अहवाल सादर केला. यामध्ये तेलगोटे यांच्या काळात म्हणजे २०२१-२२ मध्ये क्रीडांगण विकास योजना राबवताना योग्यप्रकारे जबाबदारी पार पाडली गेली नाही, असा ठपका ठेवण्यात आला. पुरवठधारकाकडून खरेदी केलेल्या वस्तूंचा पुरवठा करण्यात आला असेल तर अंतिम देयके जोडणे आवश्यक आहे. मात्र, फाईलमध्ये देयके आढळून आली नाहीत. त्यामुळे पुरवठाधारकांना निधी देताना नियमांचे पालन केले नाही, असे समितीचे म्हणणे आहे. हे सर्व आरोप गंभीर असल्याने यावर प्रादेशिक उपायुक्त काय कारवाई करणार, असा प्रश्न आहे.

सुशील शिंदेंकडून तक्रार

प्रादेशिक समाज कल्याण कार्यालयातील वरिष्ठ लिपिक सुशील शिंदे यांनी प्रतापनगर पोलिसात याबाबत तक्रार केली. सुकेशिनी तेलगोटे यांनी शासनाची दिशाभूल करून बनावट कागदपत्रे बनवून घोटाळे केल्याचा आरोप या तक्रारीत आहे.

चौकशी समितीचा अहवाल आकसबुद्धीने तयार करण्यात आला आहे. मी केवळ निधीला मंजुरी देणारी संस्था म्हणून काम केले. त्यामुळे अहवालातील आरोप तथ्यहीन आहेत. तसेच सुशील शिंदे विक्षिप्त माणूस आहे. कार्यालयात त्याच्या संदर्भात अनेक तक्रारी आहेत. त्याने अनेकदा गोपनीय माहिती उघड केली आहे. कार्यालयात अनेकदा तो मद्यपान करून आल्याचे आढळून आले आहे. त्याने केलेले आरोप बिनबुडाचे आहेत.

– सुकेशिनी तेलगोटे, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग नागपूर

कार्यालयाकडे अहवाल सादर झाला असून त्यावर कार्यवाही सुरू आहे. अहवालात जबाब नोंदविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना बोलावून सविस्तर चौकशी केली जाईल व त्यानंतर सर्व बाबी तपासून योग्य कारवाई केली जाईल.

– डॉ. सिद्धार्थ गायकवाड, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण.

विभागाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह

क्रीडांगण विकास योजनेंतर्गत घोटाळ्याच्या तक्रारी यापूर्वीही झाल्या आहेत. भंडारा-गोंदिया लोकसभेचे माजी खासदार सुनील मेंढे यांनी तशी तक्रार केली होती. विजय वडेट्टीवार यांनी विरोधी पक्षनेते असताना या घोटाळ्यावर विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. मात्र, यानंतरही सामाजिक न्याय विभागाच्या नागपूर प्रादेशिक कार्यालयाने चौकशी केली नाही. आता चौकशी समितीने आपल्या अहवालात अनेक गोष्टींवर ठपका ठेवला आहे. त्यामुळे विभागाकडून काय कारवाई होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बनावट दस्तऐवज

अहवालानुसार, चौकशी समितीने समाज कल्याण विभागातील सहाय्यक आयुक्तांच्या कार्यालयाची तपासणी केली असता उपस्थित कर्मचाऱ्यांनी सांगितले की, अनुदान वितरण पूर्व झाल्यानंतर तथा पुरवठाधारकास अंतिम रक्कम अदा केल्यानंतर फाईल तयार झाली आहेत. त्या अनुषंगाने समिती सदस्यांद्वारे सदर फाईलची कार्यालयीन पूरक दस्ताऐवजाच्या आधारे फेरतपासणी केली असता खरेदी प्रक्रियेतील दस्तऐवज बनावट असल्याचे समोर आले.

# त्यांच्या वाणीतून....

राज्यातील महत्त्वाच्या सर्व प्रकल्पांचे भूसंपादन ठरलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण करून प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावावेत. तसेच भूसंपादनाअभावी एकही प्रकल्प रखडणार नाही याची संबंधित सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी.

– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

माझे टीम इंडियात परतण्याचे प्रयत्न संपले नाही आहेत. मी स्वत:ला निवडू शकत नाही.मला काही सामने खेळायचे आहेत.तंदुरुस्त व्हायचे आहे.परत येण्यासाठी, मला स्पर्धात्मक क्रिकेट खेळावे लागेल. माझा प्रयत्न तंदुरुस्त होऊन संघात परतण्याचा आहे.

– टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज उमेश यादव

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894